९

**जिल्हाधिकारी नांदेड, यांजकडून**

**अधिसुचना (कलम-१९)**

**क्र.२०२३/आरबी/डेस्क-३/भुसं/सिआर-३३**

**दिनांक १४/१०/२०२५**

**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३**

**जा.क्र.२०२३/उपविअ/बाळापूर/सिआर-०१.—** ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नांदेड जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा **निर्देश उक्त अधिनियम** असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, अधिसुचना क्र.११ पान क्र.३५७ वर दिनांक २१-२७ मार्च २०२४ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर या विभागाच्या खर्चाने करण्याची आवश्यकता आहे.

आणि ज्याअर्थी, नांदेड (जिल्ह्याच्या) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्याची खात्री पटली आहे. आणि म्हणुन, उक्त अधिनियमाच्या कलम-१९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी **पुनर्वसाहत क्षेत्र** म्हणुन निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी धर्माबाद यास पदनिर्देशित करीत आहे.

गावाचे नांवः मौ. बाळापूर ता. धर्माबाद जि. नांदेड

| अ.क्र. | भुमापन क्र. किंवा गट नं. | क्षेत्र (हे.आरमध्ये) | सोडुन देण्यात आलेले जमीनीचे क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|---|
| ०१ | मा.क्र.४३६ | ०.०४०९.४२ | - |
| ०२ | मा.क्र.३८५/१ | ०.०१४९.०० | - |
| ०३ | मा.क्र.१-९५५ | ०.०१३२.८९ | - |
| ०४ | मा.क्र.४३० | ०.०६८९.३० | - |
| ०५ | मा.क्र.३९० | ०.०१३९.४० | - |
| ०६ | मा.क्र.१/३८३ | ०.०१३९.४० | - |
| ०७ | मा.क्र.३८५ | ०.०१४८.७७ | - |
| ०८ | मा.क्र.३८७ | ०.०२७२.३५ | - |
| ०९ | मा.क्र.३८२/२ | ०.०.४९.२५ | - |
| १० | मा.क्र.१६ | ०.०.१४९.० | - |
| ११ | मा.क्र.३८४ | ०.०.१४९.० | - |
| १२ | २/१ | ०.०८ | - |
| १३ | २/१ | ०.०७ | - |
| १४ | २/१ | ०.०६ | - |
| १५ | ०३ | ०.०६ | - |
| १६ | ०३ | ०.१० | - |
| १७ | ०३ | ०.१२ | - |
| १८ | ०४ | ०.१२ | - |
| १९ | ०४ | ०.१४ | - |
| २० | ०४ | ०.०७ | - |
| २१ | ८/सी | ०.१८ | - |
| २२ | ८/सी | ०.१० | - |
| २३ | ८/बी | ०.३० | - |
| २४ | ८/ए | ०.२६ | - |
| २५ | ८/ए | ०.०७ | - |
| २६ | तरीची जमीन | — | ०.५१२४ |
| २७ | रस्ता व गावठानची रिकामी जागा | -- | ०.५४९९ |
| २८ | सरकारी ६२९ | — | ०.२३ |
| | एकूण | १.९७७७ | १.९३१४ |

अनुसुची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नांवः-** भूसंपादन प्रस्ताव-नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील रा.मा.२६८ ते प्रजितमा-४१ पर्यंत धर्माबाद शहरासाठी बाह्य वळण रस्त्याचे किमी ०/०० ते १/१०० मौ. बाळापूर ता. धर्माबाद जि. नांदेड

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णनः-** भूसंपादन प्रस्ताव-नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील रा.मा.२६८ ते प्रजितमा-४१ पर्यंत धर्माबाद शहरासाठी बाह्य वळण रस्त्याचे किमी ०/०० ते १/१०० मौ. बाळापूर ता. धर्माबाद जि. नांदेड.

समाजाला होणारे लाभः- दळण वळण

अनुसुची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गावाचे नांवः- मौ. बाळापूर ता. धर्माबाद जि. नांदेड

| अ.क्र. | भुमापन क्र.किंवा गट नं. | क्षेत्र (हे.आर मध्ये) |
|---|---|---|
| - | — लागु नाही— | — |

अनुसुची - चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

—लागु नाही—

टिपः- उक्त जमिनीच्या नकाशाचे निरीक्षण उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी धर्माबाद यांचे कार्यालयात करता येईल.

दिनांकः-१४/१०/२०२५ स्वा/-

ठिकाणः- नांदेड जिल्हाधिकारी नांदेड